# छंद पुष्परचनेचा - १६

पाश्चात्य पुष्परचनांचे वर्गीकरण रचनेच्या आकारानुसार केले जाते. या भागात अर्धवर्तुळाकार रचना आपण बघणार आहोत.

या रचना कमी उंचीच्या पुष्पपात्रात किंवा एकदम लांबट गोल ताटली किंवा ट्रेमध्ये फ्लोरल स्पंज ठेवून करता येतात.



शेजारील फोटोमधील रचनेत जर्बेरा, व पिवळे कार्नेशन वापरले आहे. ही रचना करताना फुलांच्या मागे हिरवे ॲस्परागस वापरले आहे. प्रथम ते अर्धवर्तुळाकार आकारात लावून घेतले व नंतर त्यापुढे जर्बेराची फुले अर्धवर्तुळाकार आकारात लावली. मध्यभागी पिवळे कार्नेशन व पुन्हा जर्बेराचा वापर केला आहे. यात विविध संगती साधता येईल. रचना करताना पुढील बाजूने फ्लोरल स्पंज दिसणार नाही. याची काळजी घ्यावी.



शेजारी फोटोमध्ये 'c' आकारात अर्धवर्तुळाकार रचना थोड्या वेगळ्या पद्धतीने केली आहे. यात आकार साधण्यासाठी सायकसची वाळलेली पाने व पांढरी ग्लॅडिओली यांचा वापर केला आहे. मध्यभागी जर्बेराबरोबर फिलर म्हणून निलगिरीच्या झाडाची फळे यांचा वापर केला आहे. रचना करताना सुरुवातीला सायकसच्या पानांची उंची ठरवून दोन्ही बाजूला फ्लोरल स्पंजमध्ये लावली व नंतर मधला भाग पूर्ण केला.

पुढील भागात त्रिकोणी रचनांची माहिती घेऊ.

सौ. अरुंधती शिरीष देशपांडे
इकेनोबो इकेबाना, न्यूयॉर्क चॅप्टर
asdssd@gmail.com